दै. सकाळ दि. 03.01.2020

सकाळ
दि-03.01.20

# जनावरे चोरणारी टोळी भोकर पोलिसांच्या जाळ्यात

**भोकर, ता. २ (बातमीदार)** : तालुक्यात जनावरे चोरणारी टोळी सक्रीय झाली असून पशुपालकांत भीतीचे वातावरण आहे. बुधवारी (ता. दोन) मध्यरात्रीच्या सुमाराला भोकर - म्हैसा रस्त्यावर असलेल्या गांधीनगरात बाहेर बांधून ठेवलेल्या जनावरांना बेशुद्ध करून वाहनातून नेताना नागरिकांनी पकडून पोलिसांच्या स्वाधीन केल्याने गुरुवारी पोलिसांनी तीन आरोपीस अटक करून गुन्हा दाखल केला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, भोकर शहरात मागील काही दिवसांपासून जनावरे चोरणारी टोळी सक्रीय झाली आहे. यापूर्वी अशाच पद्धतीने अज्ञात चोरट्यांनी शहरातील जनावरे चोरून नेली होती. त्यामुळे पशुपालकांत भीतीचे वातावरण पसरले होते. त्यापाठोपाठ बुधवारी मध्यरात्री भोकर-म्हैसा रस्त्यावर असलेल्या गांधीनगर वसाहतीत घराबाहेर बांधलेल्या जनावरांना गुंगीचे औषध देऊन बेशुद्ध करून स्कारपीओ वाहनात टाकत असल्याची चाहूल बालाजी रामचंद्र चारलेवाड यांना लागली.

बालाजीने मोबाईलवरून वसाहतीमधील नागरिकांना सदरील घटनेची माहिती दिली. नागरिकांनी चोरट्यांना रंगेहाथ पकडून पोलिस जमादार उमेश कारामुंगे व कृष्णा तलवारे यांना कळविले असता, तत्काळ पोलिस घटनास्थळी जावून आरोपी महम्मद अहमद महम्मद हुसेन (वय ३८, रा. देगलूर नाका, नांदेड) शेख साबेर लाडलेसाब, शेख निजाम गनी (दोघेही रा. भिवंडी मुंबई) अशा तिघांना ताब्यात घेतले असून इमाम फायबर शेख हा फरार होण्यास यशस्वी झाला आहे.